# Merit cum Reservation System for Agriculture Programs

कृषि विज्ञान विद्याशाखेतील सर्व कृषि शिक्षणक्रमांना महाराष्ट्र शासनाच्या आरक्षण धोरणानुसार गुणानुक्रमानुसार खालील तक्त्यामध्ये दिल्याप्रमाणे प्रत्येक कृषि शिक्षणक्रमासाठी एकूण 60 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतात.

| अ. क्र. | सामाजिक आरक्षण वर्ग | शासनमान्य आरक्षण (%) | एकूण प्रवेश संख्या |
|---|---|---|---|
| 1. | अनुसुचित जाती : Scheduled Caste (SC) | 13.00 | 08 |
| 2. | अनुसुचित जमाती : Scheduled Tribe (ST) | 07.00 | 04 |
| 3. | विमुक्त जाती : Vimukta Jati (VJ-A) | 03.00 | 02 |
| 4. | भटक्या जमाती : Nomadic Tribe ( NT-B) | 02.50 | 02 |
| 5. | भटक्या जमाती : Nomadic Tribe ( NT-C) | 03.50 | 02 |
| 6. | भटक्या जमाती : Nomadic Tribe ( NT-D) | 02.00 | 01 |
| 7. | इतर मागासवर्ग : Other Backward Class (OBC) | 19.00 | 11 |
| 8. | सर्वसाधारण वर्ग : General (Open) | 50.00 | 30 |
| | | 100.00 | 60 |

वरील आरक्षणाशिवाय वरील सर्व आरक्षण वर्गांमध्ये पुढील आरक्षण समांतर पद्धतीने सम प्रमाणात समाविष्ट करण्यात येईल.

| अ. क्र. | समांतर आरक्षण वर्ग | शासनमान्य आरक्षण (%) | एकूण प्रवेश संख्या |
|---|---|---|---|
| 1. | महिला : Women | 30 | 18 |
| 2. | प्रकल्प बाधीत व्यक्ती : Project Affected Person (PAP) | 04 | 02 |
| 3. | अपंग व्यक्ती : Physically Handicapped (PH) | 03 | 02 |
| 4. | स्वातंत्र्य सैनिकांची मुले : Freedom Fighter (FF) | 02 | 01 |
| 5. | आजी/माजी सैनिकांची मुले : Defence Person (DP) | 02 | 01 |

### कृषि शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी प्रवेश क्षमता विभागणी तक्ता

| **Total Seats** | 60 | | | | **Program** | Certificate & Diplomas | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Category** | **%** | **General** | **Female** | **PAP** | **FF** | **DP** | **PH** | **Total** |
| **% Reservation** | | 59.00 | 30.00 | 4.00 | 2.00 | 2.00 | 3.00 | 100.00 |
| **Seats As Per%** | | 35.40 | 18.00 | 2.40 | 1.20 | 1.20 | 1.80 | 60.00 |
| **SC** | 13.00 | 4.60 | 2.34 | 0.31 | 0.16 | 0.16 | 0.23 | 7.80 |
| **ST** | 7.00 | 2.48 | 1.26 | 0.17 | 0.08 | 0.08 | 0.13 | 4.20 |
| **VJ-A** | 3.00 | 1.06 | 0.54 | 0.07 | 0.04 | 0.04 | 0.05 | 1.80 |
| **NT-B** | 2.50 | 0.89 | 0.45 | 0.06 | 0.03 | 0.03 | 0.05 | 1.50 |
| **NT-C** | 3.50 | 1.24 | 0.63 | 0.08 | 0.04 | 0.04 | 0.06 | 2.10 |
| **NT-D** | 2.00 | 0.71 | 0.36 | 0.05 | 0.02 | 0.02 | 0.04 | 1.20 |
| **OBC** | 19.00 | 6.73 | 3.42 | 0.46 | 0.23 | 0.23 | 0.34 | 11.40 |
| **Open** | 50.00 | 17.70 | 9.00 | 1.20 | 0.60 | 0.60 | 0.90 | 30.00 |
| **Total Seats** | 100.00 | 35.40 | 18.00 | 2.40 | 1.20 | 1.20 | 1.80 | 60.00 |

***PH = Physically Handicapped Person, FF= Freedom Fighter, DP= Defense Personnel, PAP= Project Affected Person.***

### ● कृषि शिक्षणक्रम प्रवेशासाठी सूचनाः

1. सर्व कृषि शिक्षणक्रमांच्या प्रवेशासाठी आपणास हवा असलेला **प्रथम प्रवेश अर्ज (Pre-Admission Form) मुक्त कृषि शिक्षण केंद्रावर विनाशुल्क उपलब्ध आहे.** सदर प्रथम प्रवेश अर्ज भरून त्यासोबत आपण निवडलेल्या शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी **जन्म दाखला, पात्रता परीक्षा गुणपत्रक, जात आरक्षण प्रमाणपत्र, अन्य समांतर आरक्षण प्रमाणपत्र, आर्थिक अउन्नत उत्पन्न गट प्रमाणपत्र** (Non Creamy Layer Certificate) (तीन वर्षांच्या आतील) या कागदपत्रांच्या

साक्षांकित सत्यप्रती (Attested Copies) जोडून **मुक्त कृषि शिक्षण केंद्रावर ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरण्यात यावा.**

2. प्रवेशाची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर दिलेल्या मुदतीमध्ये रितसर प्रवेश अर्ज (Admission Form) आणि प्रवेश शुल्क भरून आपला प्रवेश निश्चित करून घेणे बंधनकारक आहे.
3. सामाजिक मागास संवर्गात असूनही जातीचे प्रमाणपत्र अथवा समांतर आरक्षण प्रमाणपत्र सादर करू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादी तयार करताना सर्वसाधारण (Open) संवर्गात धरून प्रवेश देण्यात येतो.
4. अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) या विद्यार्थ्यांशिवाय इतर सर्व मागास संवर्गातील विद्यार्थ्यांनी आर्थिक अउन्नत उत्पन्नगट प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) प्रथम प्रवेश अर्जासोबत न जोडल्यास त्यांना सर्वसाधारण (Open) संवर्गात धरून प्रवेश देण्यात येतो.
5. विशेष मागासवर्गातील (Special Backward Class : SBC) विद्यार्थ्यांना 2% म्हणजेच 1 जागेवर गुणवत्ता यादीमधील इतर मागास वर्गामध्ये शिल्लक राहीलेल्या जागेवर प्रतिक्षा यादी (Waiting List) च्या वेळी प्रवेश देण्यात येतो.
6. एखाद्या कृषि शिक्षणक्रमासाठी प्राप्त झालेल्या एकूण प्रथम प्रवेश अर्जाची (Pre-Admission Form) संख्या 60 पेक्षा कमी असल्यास गुणवत्ता यादी तयार न करता सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो.
7. विद्यार्थ्यांना एकापेक्षा जास्त शिक्षणक्रमांसाठी आणि एका पेक्षा जास्त कृषि शिक्षण केंद्रांवर प्रथम प्रवेश अर्ज (Pre-Admission Form) भरता येतो. **मात्र गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर कोणत्याही एकाच कृषि शिक्षणक्रमास आणि एकाच कृषि शिक्षण केंद्रावर प्रवेश अर्ज** (Admission Form) **भरता येतो.**
8. **प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर पहिल्या गुणवत्ता यादीनुसार (Merit List Admission Round) दिलेल्या मुदतीमध्ये गुणवत्ता यादीनुसार प्रवेश देण्यात येईल. गुणवत्ता यादी संपल्यानंतर प्रतिक्षा यादीतील (Waiting List Admission Round) विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल आणि त्यानंतर शिल्लक राहिलेल्या जागांवर प्रथम येणारास प्रथम प्रवेश देण्यात येईल.**

## कृषि शिक्षणक्रम प्रवेशासाठी शैक्षणिक पात्रता, प्रवेश क्षमता व कालावधी

कृषि शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी खालीलप्रमाणे प्रवेश पात्रता परीक्षेतील प्राप्त गुण विचारात घेऊन गुणवत्ता याद्या तयार करण्यात येतील.

1. **माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम** : इयत्ता 10 वी पास/नापास परीक्षेतील शेकडा गुण.
2. **कृषि अधिष्ठान शिक्षणक्रम** : इयत्ता 12 वी पास/नापास परीक्षेतील शेकडा गुण किंवा माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र परीक्षेतील शेकडा गुण. किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या 12वी समकक्ष शिक्षणक्रमातील शेकडा गुण.
3. **उद्यानविद्या पदविका/कृषि व्यवसाय व्यवस्थापन पदविका/कृषि पत्रकारिता पदविका/फळबागा उत्पादन पदविका/भाजीपाला उत्पादन पदविका/फुलशेती व प्रागंण उद्यान पदविका शिक्षणक्रम** : मुक्त विद्यापीठाच्या कृषि अधिष्ठान परीक्षेतील शेकडा गुण किंवा कृषि विद्यापीठाच्या कृषि पदविका किंवा समकक्ष पदवी परीक्षेतील शेकडा गुण.
4. **कृषि विज्ञान पदवी आणि उद्यान विद्या पदवी शिक्षणक्रम** : मुक्त विद्यापीठामार्फत आयोजित केलेल्या पदवी प्रवेश परीक्षेत एकूण 200 गुणांपैकी किमान 100 गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना कृषि विज्ञान पदवी आणि उद्यानविद्या पदवीसाठी प्रवेश देण्यात येईल.
5. **पदविका प्रवेशासाठी ATKT** : पदविका शिक्षणक्रमास प्रवेश घेताना कृषि अधिष्ठान शिक्षणक्रम पूर्ण असणे आवश्यक आहे. (ATKT लागू नाही).